RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

वर्ष - २ रे | अंक -१० वा | अमरावती (महाराष्ट्र) | गुरुवार दि.२५ जानेवारी २०२४ | संपादक - शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -६

## इंडिया आघाडी चालेल.. ममता बॅनर्जी आणि 'आप' च्या निर्णयानंतर देवेंद्र फडणवीसांची उपरोधिक टीका

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

भाजपाला आगामी लोकसभा निवडणुकीत पराभूत करण्यासाठी काँग्रेस आणि इतर प्रादेशिक पक्षांनी एकत्र येऊन राष्ट्रव्यापी आघाडी स्थापन केली. या आघाडीला इंडिया आघाडी असे नाव देण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेतून खाली खेचण्याचा निर्धार आघाडीमधील पक्ष आणि त्यांचे नेते करत होते. मात्र निवडणूक जवळ येताच आघाडीमध्ये जागावाटपावरून मतमतांतर दिसत आहेत.



पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लोकसभा निवडणुकीला 'एकला चलो रे'ची भूमिका घेतली आणि त्यानंतर पंजाबचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते भगवंत मान यांनीही लोकसभेच्या सर्व जागा लढणार असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे इंडिया आघाडीच्या शकलावर आता भाजपाकडून जोरदार टीका होत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही उपरोधिक टीका करत इंडिया आघाडीला लक्ष्य केले.

एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना मुख्यमंत्री भगवंत मान म्हणाले, पंजाबमध्ये आम्ही काँग्रेसबरोबर युती करणार नाही. राज्यातील १३ जागांवर आम्ही स्वबळावर लढणार असून त्याठिकाणी आम्हाला यश मिळेल. तसेच पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने फक्त दोन जागा काँग्रेसला देऊ केल्या आहेत. काँग्रेसने १० ते १२ जागांची मागणी केली होती. यावरून लोकसभेचे काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच पश्चिम बंगालमध्ये भारत जोडो न्याय यात्रेने आज प्रवेश केला आहे. त्यामुळेही दोन्ही पक्षात वादाची ठिणगी उडाली आहे.

**आघाडीत प्रत्येकाचे वेगळे सूर**


इंडिया आघाडी ही मुळात आघाडीच नाही. या आघाडीतील सर्व पक्ष आपापले गाणं गात असून समूहगाण होईल, अशी त्यांची इच्छा आहे. पण समूहगाण गाण्यासाठी कोरसमध्ये गावे लागते, तिथे एकाचवेळी सर्वांनी गाऊन चालत नाही. इंडिया आघाडीतील प्रादेशिक पक्ष आणि काँग्रेसची त्या त्या राज्यात थेट स्पर्धा आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्ष काँग्रेसला आपला वाटा देणार नाहीत. त्यामुळे इंडिया आघाडी चालेल असे मला कधीही वाटले नाही, पुढेही ही आघाडी चालणार नाही, असे टीकास्त्र देवेंद्र फडणवीस यांनी सोडले.

## मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला आझाद मैदानात परवानगी नाकारली

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मराठा आरक्षणासाठी गेल्या काही दिवसापासून आंदोलन सुरू आहे. मनोज जरांगे पाटील २६ जानेवारीपासून मुंबईत आंदोलनाला बसणार आहेत. लाखो मराठा आंदोलकांसह मनोज जरांगे पाटील लोणावळ्यापर्यंत आले आहेत. दरम्यान, आता मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील यांना नोटीस बजावली आहे. मुंबई पोलिसांनी आझाद मैदानात परवानगी नाकारली आहे. काल हायकोर्टात या आंदोलनाबाबत एक सुनावणी झाली या सुनावणीत हायकोर्टाने मुंबई पोलिसांना याबाबत आदेश दिले होते.

मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात आंदोलक येणार आहेत.



आझाद मैदानावर एवढी मोठी क्षमता नाही तर बाकीच्या मैदानावर अन्य नियोजित कार्यक्रम आहेत, त्यामुळे मुंबईत या मोर्चाला परवानगी दिलेली नाही, असंही मुंबई पोलिसांनी सांगितले आहे. यामुळे हा मोर्चा मुंबईत न येता खारघर येथील मैदानावर सुरू ठेवावे. तसेच याच्या परवानगी संबंधीत कार्यालयातून घ्याव्यात, असं या नोटीसात कळवण्यात आले आहे. काल हायकोर्टाने याबाबत सूचना दिल्या होत्या.

**मनोज जरांगेंसोबत शिष्टमंडळाची बैठक निष्फळ!**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासह लाखो आंदोलक आता मुंबईच्या वेशीवर आले आहेत. २६ जानेवारीपासून मनोज जरांगे पाटील मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करणार आहेत. आज जरांगे पाटील यांचा ताफा लोणावळ्यात पोहोचला आहे, तर दुसरीकडे सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगे यांच्यासोबत बैठक घेतली, पण ही बैठक निष्फळ ठरली आहे. मनोज जरांगे पाटील मुंबईत आंदोनाला येण्यासाठी ठाम आहे.

## पहिल्याच दिवशी श्रीराम चरणी सव्वा तीन कोटींचे दान

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा होताच अयोध्येतील राम मंदिरात भक्तांची रीघ लागली आहे. २२ जानेवारीला प्राणप्रतिष्ठा सोहोळा झाला आणि मंदिर भक्तांसाठी खुले झाले. तेव्हापासून तेथे दर्शनासाठी भक्तांच्या रांगाच रांगा लागल्या आहेत. याचाच परिणाम म्हणून पहिल्याच दिवशी श्रीराम चरणी सव्वा तीन कोटींचे दान आले आहे.



रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर पहिल्याच दिवशी राम भक्तांकडून ३ कोटी १७ लाखांचे दान करण्यात आले. राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे विश्वस्त अनिल मिश्रा यांनी ही माहिती दिली. प्राणप्रतिष्ठेच्या दिवशी १० दान काउंटर उघडण्यात आले होते. २२ जानेवारीला प्राणप्रतिष्ठा समारंभानंतर, भक्तांनी दान काउंटर आणि ऑनलाइन देणगीच्या स्वरुपात ३.१७ कोटी रुपयांची देणगी दिली आहे.

प्राणप्रतिष्ठेच्या दुसऱ्याच दिवशी, अर्थात २३ जानेवारीला पाच लाखांहून अधिक भक्तांनी प्रभू रामचंद्रांचे दर्शन घेतले. तर बुधवारी रात्री १० वाजेपर्यंत अडीच लाखांहून अधिक भाविक दर्शनासाठी आले. बुधवारी किती देणगी मिळाली, हे मोजदाद केल्यानंतर सांगितले जाईल, असेही मिश्रा म्हणाले. तसेच भाविकांना व्यवस्थित दर्शन घेता यावे यासाठी प्रशासनासोबत चर्चा करून व्यवस्था केली जात आहे.

दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी अयोध्येच्या जवळपास राहणाऱ्या संघ कार्यकर्त्यांना मंदिराच्या स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारण्यासंदर्भात आणि मंदिरात दर्शन व्यवस्थितपणे व्हावे, यासाठी सहकार्य करण्यास सांगितले आहे.

**मंदिरात भाविकांची गर्दी**

प्राणप्रतिष्ठेनंतर मंदिर सर्वसामान्यांसाठी खुले करण्यात आले. त्यानंतर तेथे भाविकांची मोठी गर्दी दिसली. सकाळपासूनच रामपथ आणि मंदिर परिसरात भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. विशेष म्हणजे कडाक्याची थंडी, धुके या कशाचाही परिणाम भाविकांवर झाला नाही. उलट मंदिराबाहेर रांगाच्या रांगा लावून भक्त 'जय श्री राम'च्या घोषणा देत होते.

## महाविकास आघाडीकडून प्रकाश आंबेडकरांना चर्चेसाठी अधिकृत निमंत्रण

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून चर्चेचा केंद्रबिंदू झालेल्या वंचित आघाडीच्या प्रकाश आंबेडकर यांना महाविकास आघाडीकडून चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आलं आहे. त्यामुळे अधिकृत चर्चेचं निमंत्रण आल्याने चर्चेची कोंडी फुटण्याची शक्यता आहे. प्रकाश आंबेडकर यांनी गेल्या काही दिवसांपासून इंडिया आघाडी तसेच महाविकास आघाडीकडून चर्चेसाठी कोणतेच निमंत्रण नसल्याचे जाहीरपणे सांगितले होते. त्यामुळे चर्चा होणार तरी कधी? अशी चर्चा रंगली होती. मात्र, गेल्या २४ तासात इंडिया आघाडीमध्ये झालेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीकडून प्रकाश आंबेडकर यांना तातडीने चर्चेसाठी बोलावण्यात आलं आहे. त्यामुळे या बैठकीत काय चर्चा होते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष असेल.मात्र अजुन पर्यन्त कोणत्याही



प्रकारचे निमंत्रण आलेचनसल्याचे वंचित कडून सांगण्यात आले आहे.

**राजू शेट्टी यांना निमंत्रण नाही**

दुसरीकडे, महाविकास आघाडीच्या बैठकीचं स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांना आमंत्रण देण्यात आलेलं नाही. माजी खासदार राजू शेट्टी यांनी याबाबत एबीपी माझाला माहिती दिली आहे. शिवाय राजू शेट्टी सध्या एकला चलो रेच्या भूमिकेवर ठाम आहेत. दरम्यान, महाविकास आघाडीच्या कोणत्याही बैठकीचे मला निमंत्रण आलेले नाही, असे राजू शेट्टी यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून हातकणंगलेची जागा राजू शेट्टी यांना सोडण्याची शक्यता आहे. पण राजू शेट्टी मात्र एकला चलो रेच्या भूमिकेवर अजून तरी ठाम आहेत.

**जागावाटपावर चर्चा होणार?**

राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेस या महाविकास आघाडीतील घटक पक्षामध्ये जागावाटपावरुन अद्याप एकमत झाले नाही. शिवसेना २३ जागांवर ठाम आहे. त्याशिवाय काँग्रेसलाही जास्त जागा हव्या आहेत. त्यामुळे मागील काही दिवसांत बैठकात तोडगा निघालेला नाही. त्यात प्रकाश आंबेडकर आणि राजू शेट्टी यांना तीन जागा देण्याबाबत चर्चा सुरु आहे.

## वाढत्या महागाईत मध्यवर्गीयांना दिलासा; खाद्यतेल होणार स्वस्त?

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई:**

महागाई कमी करण्यासाठी केंद्र सरकार सातत्याने पावलं उचलत आहे. या संदर्भात, नवीन वर्ष, होळी आणि लग्नसमारंभात खाद्यतेलाच्या किमती नियंत्रित ठेवण्याच्या उद्देशाने, शुल्क सवलत मर्यादा १ वर्षाने वाढवण्यात आली आहे. तसंच, आगामी अर्थसंकल्प आणि लोकसभा निवडणुकांपूर्वी केंद्रातील मोदी सरकार ग्राहकांना मोठा दिलासा देण्यासाठी खाद्यतेलाच्या किंमती कमी होण्याची शक्यता



आहे. मागच्या काही महिन्यांपासून अन्नधान्य, डाळी, भाज्या, मसाले आणि इतर पदार्थ महागल्याने गृहिणींचे किचन बजेट कोलमडले आहे. त्यामुळे आता खाद्यतेल स्वस्त करून सरकार सर्वसामान्यांना दिलासा देण्याची शक्यता आहे.

त्यादृष्टीने केंद्र सरकारच्या ग्राहक मंत्रालयाने खाद्य तेल उत्पादक कंपन्यांना एक पत्र लिहिलं आहे. सॉल्वेंट एक्स्ट्रक्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाला जागतिक स्तरावरील किमतीच्या आधारे खाद्यतेलाच्या भावात कपातीचे निर्देश देण्यात आले आहेत.कुकिंग ऑईल इंडस्ट्रीमधील तज्ज्ञांच्या मते, यावेळी खाद्यतेलाच्या किंमतीत एकदमच कपात करणं शक्य नाही. पण टप्प्याटप्प्याने हा निर्णय अंमलबजावणीत येईल. मार्च महिन्यापर्यंत खाद्यतेलाच्या किंमतीत कपातीची शक्यता आहे. देशात मोहरीचे उत्पादन आता हाती येईल. त्यानंतर नवीन तेलाचा बाजारात पुरवठा होईल. तोपर्यंत किंमतीत कपात करणं शक्य नसल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. अर्थात याविषयीची कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

**किमती कधी होणार कमी?**

वनस्पती तेल ब्रोकरेज कंपनी सनविन ग्रपुचे सीईओ संदीप बजोरिया म्हणाले की, डिसेंबरमध्ये खाद्यतेलाच्या किमती सुमारे १० टक्के कमी झालेल्या आणि जानेवारीमध्ये किमती पुन्हा ८ टक्के वाढल्या. विविध कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनुसार सरकारने सक्ती केल्यास कंपन्या केवळ ३-४ टक्के किंमती कमी करू शकतील.

## महाराष्ट्रातील ६२ पोलिसांना पदके जाहीर त्यात ४ अधिकारी 'राष्ट्रपती पदका'चे मानकरी

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई:**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून पोलीस पदकं जाहीर करण्यात आली आहेत. देशभरातून पोलीस, अग्निशमन सेवा, गृहरक्षक दल आणि नागरी संरक्षण दल आणि सुधार सेवेतील एकूण ११३२ कर्मचाऱ्यांना शौर्य/सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. यात महाराष्ट्रचा दबदबा असल्याचं दिसून येत आहे. महाराष्ट्रातील ६२ पोलिसांना पदकं जाहीर करण्यात आली आहेत. त्यातील ४ पोलीस अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आलं आहे. तर १८ पोलीस जवानांना शौर्य पदके आणि ४० पोलीस जवानांना उल्लेखनीय सेवेसाठी पदक जाहीर झाले आहे.

**या चार अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदकं जाहीर**

महाराष्ट्रातले अतिरिक्त पोलीस महासंचालक निकेत कौशिक, मीरा भाईंदर वसई विरारचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे , विशेष पोलीस महानिरीक्षक दिलीप सावंत आणि पोलीस निरीक्षक मधुकर कड यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे.महाराष्ट्रातल्या १८ पोलीस जवानांना शौर्य पदके जाहीर झाली आहेत. यात नक्षलप्रभावीत जिल्ह्यात उल्लेखनीय कामगिरी केलेले अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासह उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांचा समावेश आहे. महाराष्ट्रीतील ४० पोलीस जवानांना उल्लेखनीय सेवेसाठी पदक जाहीर झाले असून, यात कायदा आणि सुव्यवस्था विभागाचे सह पोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी यांचा समावेश आहे. पोलीस उपअधीक्षक,वाहतूक (उत्तर गोवा) सिद्धांत शिरोडकर यांना विशिष्ट सेवा राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे.

## मविआ बैठकीत वाटाघाटी करणारे काँग्रेसचे दोन बडे नेते भाजपात येणार; आशिष देशमुखांचा दावा

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची महत्वाची बैठक होत आहे. लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटपासंदर्भात अद्याप महाविकास आघाडीमध्ये एकमत झालेले नाही. त्यामुळे या बैठकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. यातच या बैठकीला आता महाविकास आघाडीने वंचित बहुजन आघाडीला अधिकृत निमंत्रण दिले आहे. या घडामोडी सुरू असताना भाजप नेते आशिष देशमुख यांनी मोठा दावा केला आहे.



विकसित भारताची संकल्पना साकार करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत अनेक नेते भाजपामध्ये येण्यास इच्छूक आहेत. अलीकडेच उत्तर महाराष्ट्रातील काँग्रेस नेते आणि माजी खासदार उल्हास पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. त्यापूर्वी माजी खासदार मिलिंद देवरा यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देशाला जगतगुरू करण्यासाठी अनेक नेते भाजपामध्ये येणार आहेत. आम्ही त्या सर्वांचे स्वागत करतो, असे आशिष देशमुख यांनी म्हटले आहे.

**थोड्याच दिवसात भाजपा प्रवेशाचा मुहूर्त तुम्हाला कळेल**

महाविकास आघाडीच्या बैठकीत वाटाघाटी तीनही पक्षाचे नेते सहभागी होत आहेत. त्यात महत्त्वाच्या नेत्यांपैकी दोन नेत्यांची भाजपशी पूर्णपणे बोलणी झालेली आहे. लवकरच ते भाजपामध्ये प्रवेश करतील. काही दिवस वाट पाहा. थोड्याच दिवसात भाजपा प्रवेशाचा मुहूर्त तुम्हाला कळेल, असे आशिष देशमुख यांनी सांगितले.दरम्यान, महाविकास आघाडीतील महत्त्वाचे नेते या बैठकीसाठी उपस्थित असणार आहेत. आता वंचित बहुजन आघाडी या बैठकील उपस्थित राहणार का नाही हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## संपादकीय ......

# वर्षातील दुसरी दिवाळी!

तीन महिन्यांपूर्वी पारंपरिक दिवाळी साजरी झाल्यानंतर देशाने पुन्हा एक 'दिवाळी' सोमवारी साजरी केली. निमित्त होते अयोध्येतील बालरूपातील रामलल्लांच्या प्रतिष्ठापनेचे! असा सोहळा कधीतरीच होतो. तो एक इव्हेंट म्हणून साजरा केला गेला आणि अपेक्षेप्रमाणे श्रीरामावर निःस्सीम प्रेम करणार्या देश-विदेशातील भक्तांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे एक भव्य, नेत्रदीपक असा सोहळा सर्वांना अनुभवता आला. रामलल्लाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेवरून दोन भिन्न मते समोर आली, मात्र ठरल्याप्रमाणे सर्व काही पार पडले.

अयोध्येतील कार्यक्रमानिमित्ताने नीटनेटके नियोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी यासाठी हजेरी लावली. अर्थात या शाही सोहळ्याचा केंद्रबिंदू होते ते पंतप्रधान नरेंद्र मोदी! स्वाभाविकच ते काय बोलणार, याकडे अवघ्या देशाचे लक्ष लागले होते, पण त्यांनी अतिशय संयमित भाषण करताना ना विरोधकांना राजकीय कोपरखळ्या लगावल्या, ना अन्य राजकीय भाष्य केले. २२ जानेवारीचा हा केवळ सोहळा नसून नव्या कालचक्राची सुरुवात असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. बांधण्यात आलेले राम मंदिर देशाच्या उत्कर्षाचे साक्षीदार ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. काहीतरी नवीन संदेश द्यायचा ही मोदी यांच्या अनेक भाषणांची खासियत ठरली आहे. यावेळी देवापासून देशाकडे आणि रामापासून राष्ट्राकडे असा नवा मंत्र त्यांनी दिला.गेल्या अनेक महिन्यांपासून अयोध्येतील मंदिर आणि इतर कामांची तयारी सुरू होती. इतका मोठा सोहळा ठरलेल्या वेळेत पार पडण्यासाठी कारागीर, तंत्रज्ञांनी केलेली मेहनत नजरेआड करून चालणार नाही. त्यामुळे पंतप्रधानांनी या सर्वांवर पुष्पवृष्टी करीत त्यांचा सन्मान केला हे योग्यच झाले. एका भव्यदिव्य मंदिरामुळे गेल्या काळातील कटू आठवणींना पूर्णविराम मिळाला आहे. रामजन्मभूमी आंदोलनात अनेक निरपराध कारसेवकांचे बळी गेले. यावरून बरेच राजकारणही झाले. हिंसक दंगलीही झाल्या, मात्र सरतेशेवटी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर मंदिर-मशीद हा वाद सामोपचाराने मिटविण्यात आला.कधीकाळी भारतभूमीवर रामराज्य अस्तित्वात होते. तसे रामराज्य येणे शक्य नसले तरी किमान साधनशुचिता पाळणे अपेक्षित आहे. किंबहुना विस्कटलेल्या समाज व्यवस्थेसाठी ती काळाची गरज ठरली आहे. सध्याचे युग विज्ञानाचा आधार घेऊन चालते. रामराज्याशी याची चपखल सांगड घालावी लागेल. आचार-विचार चांगले असतील तर भारत विश्वगुरू होण्याचा दिवस दूर नसेल. सामान्यांना घाणेरड्या राजकारणाबद्दल, नेत्यांच्या चापलुशीवर तीव्र संताप आहे. त्यामुळे रामराज्य खरोखरंच यावे अशी राजकीय नेत्यांची इच्छा असेल, तर त्याची सुरुवात आपल्याकडून करावी लागेल.

श्रीरामांच्या मंदिरामुळे भविष्यात अयोध्या भूमीला अनन्यसाधारण महत्त्व येणार आहे. आध्यात्मिक पर्यटनाचे ते जागतिक केंद्र होणार आहे. सोमवारच्या सोहळ्याने या स्थानाबद्दलची उत्सुकता ताणली गेली आहे. त्यामुळे अयोध्या नगरीला प्रत्येक दिवस हा जणू जत्रेसारखा असणार आहे. यातून मोठी आर्थिक उलाढाल होणार असल्याने उत्तर प्रदेश राज्यासाठी ती अभिमानाची बाब ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना नवनिर्माणाचे स्वप्न दाखविले आहे. त्यासाठी प्रामाणिकपणे योगदान देणे हाही एक रामराज्य संकल्पनेचाच भाग ठरणार आहे.

# भारतीय प्रजासत्ताक दिन

*भारतीय प्रजासत्ताक दिवस.प्रजासत्ताक म्हणजे देशात राहणाऱ्या लोकांची सर्वोच्च शक्ती आणि देशाला योग्य दिशेने नेण्यासाठी राजकीय नेते म्हणून त्यांचे प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार फक्त जनतेला आहे. म्हणून, भारत हा एक प्रजासत्ताक देश आहे जिथे जनता आपला नेता पंतप्रधान म्हणून निवडते. हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय दिन आहे.भारतातील सर्व शाळा आणि महाविद्यालये तसेच शासकीय संस्था, खाजगी संस्था, ग्रामपंचायती अशा विविध ठिकाणी २६ जानेवारी रोजी ध्वजवंदन केले जाते आणि भारतीय संविधानाप्रती आदर व्यक्त केला जातो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान संविधान समितीने २६ नोव्हेंबर, इ.स. १९४९ रोजी स्वीकारले व २६ जानेवारी इ.स. १९५० रोजी पासून भारतीय संविधान अंमलात आले. तत्कालीन प्रधानमंत्री यांनी ३१ डिसेंबर, इ.स. १९२९ रोजी रावी नदीच्या काठी अशोक चक्रांकित तिरंगा ध्वज फडकावून पूर्ण प्रजासत्ताकाची (स्वातंत्र्याची) घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते. भारताचे राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा महाविद्यालयांमध्ये भाषणाचे कार्यक्रम आयोजित केले जाते.भारतालाया ब्रिटीश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ला स्वातंत्र्य मिळाले. यामागे भारताचा स्वातंत्र्य लढा यांच्या अहिंसा पद्धतीचा मोठा सहभाग आहे. तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारताचेमात्र कायदे हे भारतीय राज्यशासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर (कलमावर) आधारित होते.९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समिती स्थापना केली गेली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवसांसाठी खुला केला आणि २ वर्ष,११ महिने आणि १८ दिवसाच्या कालावधी नंतर समितीने हा मसुदा अंतिम केला. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती (हिंदी आणि इंग्रजी) २४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी लागू करण्यात आले. भारताच्या संविधानाच्या निमित्ताने भारताचा प्रजासत्ताक दिन हा साजरा करण्यात येऊ लागला.दर वर्षी २६ जानेवारी रोजी भारताच्या राजधानीत, म्हणजे नवी दिल्ली येथे, एक मोठे संचलन आयोजित केले जाते.हे संचलन रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत राजपथ मार्गाद्वारे जाते. संचलनाच्या आधी अनाम सैनिकांसाठी बनवले गेलेले स्मारक, अमर जवान*




*ज्योती, येथे भारताचे पंतप्रधान पुष्पचक्र अर्पण करतात. भारतासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात येते. त्यानंतर पंतप्रधान राजपथाच्या मुख्य मंचावर जातात व आलेल्या पाहुण्यांना भेटतात. तितक्यात प्रमुख पाहुण्यांसोबत राष्ट्रपतींचे आगमन होते. राष्ट्रगीत सुरू होताच राष्ट्रपती ध्वजारोहण करतात व २१ तोफांची सलामी दिली जाते. त्यानंतर देशासाठी*

**डॉ. धनराज चक्रे**
अमरावती



*शौर्य गाजवलेल्या सैनिकांना राष्ट्रपतींच्या हस्ते अशोक चक्र आणि कीर्ती चक्र, हे मुख्य पुरस्कार देण्यात येतात. राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेली देशातील शूर बालके सजवलेल्या हत्तीवरून किंवा वाहनावरून या संचलनात सहभागी होतात.प्रमुख पाहुणे म्हणून परराष्ट्रीय राष्ट्राध्यक्षांना निमंत्रण दिले जातेभारतीय फौजांचे (नौदल, पायदल, वायुसेना) वेगवेगळे सेनाविभाग, घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि इतर अद्ययावत शस्त्रे/क्षेपणास्त्रे (जसे पृथ्वी, अग्नी), रणगाडे समवेत संचलन करतात. भारताचे राष्ट्रपती या फौजांची मानवंदना स्वीकारतात. या संचलनाच्या सादरीकरणाची पूर्वतयारी विशेष काळजीपूर्वक आणि शिस्तीने केली जाते इतके या संचलनाचे महत्त्व आहे. नवी दिल्ली येथे होणाऱ्या संचलनाप्रमाणेच भारतातील सर्व राज्यांतही एकेक संचलन होते. प्रत्येक राज्यात त्या त्या राज्याचे राज्यपाल फौजांची मानवंदना स्वीकारतात.*

*प्रजासत्ताक दिन दिल्ली येथील संचलन (१९९४)*

*बीटिंग रिट्रीट या कार्यक्रमाने प्रजासत्ताक दिन सोहळ्याची सांगता केली जाते. सन २०१९ मध्ये, गुगलने खास प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपल्या वेबसाईटच्या भारतीय आवृत्तीवर डुडल दर्शवले. सगळ्या भारतीयांसाठी हा गर्वाचा दिवस आहे.भारत हा लोकशाही देश आहे. ज्यामध्ये लोकांना त्यांच्या देशाचे नेतृत्व करण्याची संधी मिळते. आपला देश आणखी चांगला करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. .विकासाबरोबर काही उणिवाही निर्माण झाल्या आहेत जसे की विषमता, गरिबी, भ्रष्टाचार, निरक्षरता इत्यादी. आपला देश जगातील सर्वोत्तम देश बनवण्यासाठी समाजातील अशा समस्या सोडवण्याची आज आपण प्रतिज्ञा घेण्याची गरज आहे.*

# बहिरममध्ये कापूस दिंडी, महिलांचा सहभाग उल्लेखनीय

## शासनाच्या विरोधात घोषणा, शेतकरीविरोधी धोरणांचा केला निषेध






**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक परतवाडा :** बहिरम यात्रेदरम्यान बहिरममध्ये बुधवारी कापूस दिंडी पार पडली. यात कापसाचे गाठोडे डोक्यावर घेत शेतकरी महिला व पुरुषांनी आपला सहभाग नोंदविला. दिंडीतील शेतकरीरूपी महिला व पुरुष वारकऱ्यांनी शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांचा या दरम्यान निषेध केला. कापसाचे गाठोडे डोक्यावर घेत शेतमालाला भाव मिळावा म्हणून केल्या गेलेल्या जयघोषाने अख्खी बहिरम यात्राच दुमदुमली. हा जयघोष लक्षवेधक राहिला आहे.बहिरम कापूस आंदोलन समितीचे प्रकाश साबळे, लोकविकास संघटनेचे गोपाल भालेराव, बहिरम कापूस आंदोलन स्मृती समितीचे मनीष हावरे यांच्या नेतृत्वात ही कापूस दिंडी बुधवारी पार पडली. या दरम्यान कापूस, तूर, सोयाबीन उत्पादक शेतकरी परिषदही पार पडली.

कापूस दिंडीकरिता कापसाचे गाठोडे घेऊन महिला व पुरुष शेतकरीबहिरम येथील गाडगे महाराजांच्या स्मृती स्थळाजवळ एकत्र आले. तेथून ते सर्व बहिरम यात्रेतून दिंडीने जयघोष करीत शहीद विठ्ठलराव दुतोंडे सभागृहात पोहोचले. जिल्ह्यातून वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या महिला शेतकऱ्यांनी या दिंडीचेस्वयंस्फूर्तीने केलेले नेतृत्व लक्षवेधक ठरले. यामध्ये वर्षा बोबडे, सुनीता गावंडे, कांता पेठे, आरती पाचडे, सरिता कोहळे, इंदू छापाणी, रेखा सवाई, संगीता ढोले, मालती साबळे, विमल छापाणी, प्रज्ञा साबळे, शरयू साबळे, किरण गावंडे, प्रगती तळकित, शीलाठाकरे, राधिका तळकित, ओनिश तळकित, राजकन्या जवंजाळ, लता - खाडे, पुष्पा राऊत, प्रांजली तळकित, आशा हावरे, प्रभा नागे, रंजना पटोकार गौरी हावरे, संगीता साबळे, मथुरा दहापुते, ज्योती साबळे, भारती खांडे, वैष्णवी खाडे आदींनी सहभाग घेतला.

### पिकांना भाव, शेतकऱ्यांची कर्जमाफी

कापसाला १२ हजार रुपये, सोयाबीनला नऊ हजार रुपये, तर तुरीला १४ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळावा आणि शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, असा ठराव कापूस, सोयाबीन, तूर उत्पादक शेतकरी परिषदेत घेतला गेला. तशा घोषणाही उपस्थित शेतकयांनी या दरम्यान केल्या.

### आंदोलनातील नेतृत्वाला नमन

बहिरम कापूस आंदोलनात २४ जानेवारी १९७५ रोजी शहीद झालेले विठ्ठलराव दुतोंडे आणि या आंदोलनाचे नेतृत्व केलेल्या केशरबाई सिकची, भाऊसाहेबसाबळे, दादासाहेब हावरे, शंकरराव बोबडे, मामराज खंडेलवाल, विनायक कोरडे, वामन खलोकर, एकनाथ मानकर यांना श्रद्धांजली अर्पण केली गेली.




### हिवाळ्यात मद्यपान करत असाल तर सतर्क राहा, जाणून घ्या कारण !



**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक** - हिवाळ्यात बरेच लोक जास्त मद्यपान करतात.मात्र मद्यपान केल्याने शरीराला उष्णता मिळते आणि अशा परिस्थितीत लोक थंड हवामानात जास्त मद्यपान करू लागतात,असे अनेकांचे मत आहे.पण हे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतं. जर तुम्हीही हिवाळ्यात जास्त मद्यपान करत असाल तर तुम्ही सावध राहण्याची गरज आहे कारण या ऋतूत जास्त मद्यपान केल्याने हार्ट अटॅकचा धोका वाढू शकतो. हिवाळ्यात मद्यपान केल्याने शरीरातील तापमान अधिक खाली जाते, असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जेव्हा तापमान कमी होते तेव्हा शरीरातील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि बीपी जास्त होऊ लागतो. . त्यामुळे हार्ट अटॅकचा धोका वाढतो. इतकंच नाही तर हिवाळ्यात जास्त मद्यपान केल्याने रक्ताच्या गुठळ्या तयार होतात आणि प्लेग फुटण्याचा धोका वाढतो. प्लेग फुटणे आणि रक्ताच्या गुठळ्या हृदयविकाराच्या झटक्याची कारणे मानली जातात.हिवाळ्यात मद्यपान केल्याने काही काळ शरीर उबदार होते, पण काही काळानंतर शरीर खूप थंड होते, ज्यामुळे हार्ट अटॅकचा धोका वाढतो, असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे.त्यामुळे हिवाळ्यात जास्त मद्यपान करणे टाळावे. विशेषत: ज्या लोकांचा रक्तदाब जास्त आहे आणि जे हृदयरुग्ण आहेत, त्यांनी या ऋतूत अल्कोहोलपासून दूर राहावे.तसेच हिवाळ्यात वृद्धांनीही शरीराची विशेष काळजी घ्यावी. हिवाळ्यात हार्ट अटॅकचा धोका टाळण्यासाठी शरीर उबदार कपड्यांनी झाकून ठेवावे. थंड पाणी पिणेही टाळावे .

**वरील सर्व बाबी विदर्भ प्रजासत्ताक केवळ माहिती म्हणून वाचक-प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत आहे. यातून कोणताही दावा करत नाही**

# प्रजासत्ताक दिनी वाहतूक व्यवस्थेत बदल

## नागरिकांनी नोंद घेण्याचे आवाहनशहरातील उड्डाणपूल राहणार बंद

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - शहरात शुक्रवार, दि. २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या ७४ वा वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेतील लहान मुले, पालक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या वाहनांची रस्त्यावर फार मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशावेळी वाहतुकीची कोंडी होवून अपघातासारखा अनुचित प्रकार घडू नये तसेच सार्वजनिक शांतता भंग होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून



अमरावती शहरातील सर्व हलक्या व जड वाहनांची वाहतुक नियंत्रित करण्यासाठी पोलीस उपायुक्त सागर पाटील यांनी मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम ३३ (१)(ब) तसेच मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ अन्वये आदेश निर्गमित केला आहे. शुक्रवारी, सकाळी ६ ते रात्री १२ दरम्यान शहरातील रस्ते सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहतील. त्यात मालवाहु, हलकी व जडवाहने (४०७, मिनीडोअर, ट्रक, टिप्पर, लहान ट्रक व इतर लहान मालवाहु) यांना शहरात सर्व बाजुने प्रवेश बंदी राहिल. शहरातील उड्डाणपूल गाडगेनगर, समाधी मंदीरापासून ते जिल्हा स्टेडियम येथील उड्डानपूल, इर्विन चौक ते राजापेठ पोलीस स्टेशन, कुथे हॉस्पीटल ते नंदा मार्केट व कुशल ऑटोकडे जाणाऱ्या उड्डानपुलावरून दि. २६ जानेवारी २०२४ चे सकाळी ६ ते १२ वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी राहिल. याची नोंद सर्व नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन पोलीस उपायुक्त सागर पाटील यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांसाठी परदेशी अभ्यास दौरा

## कृषी कार्यालयाशी संपर्क करण्याचे आवाहन

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** - राज्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशातील विकसित शेती व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, यासाठी कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी परदेशी अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी संबंधित तालुका कृषि अधिकारी किंवा जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय न राहता उत्पादीत होणाऱ्या शेतीमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे गरजेचे आहे. शेतीशी निगडीत वेळोवेळी होत असलेले बदल, तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. यासाठी राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देशाबाहेरील अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात येत आहे. या दौऱ्यात विविध देशांनी विकसीत केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान, विविध देशातील शास्त्रज्ञ, विकसीत शेतकरी यांच्याशी चर्चा, क्षेत्रिय व संस्थाना भेटी देण्यात येईल. या योजनेंतर्गत जर्मनी, फ्रान्स, स्पेन, स्वित्झरलँड, न्युनीलँड,



नेदरलँड, व्हिएतनाम, मलेशिया, थायलँड, पेरू, ब्राझील, चिली, ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रीया, सिंगापूर इत्यादी संभाव्य देशांची निवड करण्यात आली आहे.

शेतकरी निवडीचे निकष : लाभार्थी स्वत: शेतकरी असावा, स्वत:चे नावे चालु कालावधीचा सातबारा व ८-अ उतारा असावा, उत्पन्नाचे मुख्य साधन शेती असावे, शेतकरी कुटुंबामधुन फक्त एकाच व्यक्तीला लाभ घेता येईल. शेतकरी किमान १२ वी पास असावा, वयोमर्यादा २५ ते ६० वर्ष, शेतकरी वैध पारपत्रधारक असावा.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेत वीरपत्नी, वीरमातांसह शौर्य पदकप्राप्त सैनिकांचा सन्मान

## २६ जानेवारी रोजी आयोजन

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** प्रजासत्ताक दिनाचे औचित्स साधुन जिल्हा मध्यवर्ती बँकेत देशाकरीता शहीद झालेल्या जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता तसेच शौर्य पदक प्राप्त जनावांचा पहील्यांदाच सत्कार सोहळा २६ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे.यामध्ये २१ वीरमाता, वीरपत्नीसह ४ जवानांचा समावेश आहे. बुधवारी बँकेचे उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांनी या आयोजनाबाबत माहीती दिली.यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र बकाल उपस्थित होते.

बँकेवर अध्यक्ष बच्चु कडू, उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांच्या गटाची सत्ता प्रस्तापित होताच शेतकऱ्यांकरीता विविध उपक्रमांसह सामाजिक उपक्रम देखील सुरू झाले आहे.मागील १५ ऑगस्ट ला बँकेत पहील्यांदाच ध्वजारोहन एका वीर पत्नीच्या हस्ते करण्यात आले.तर यावेळी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन देशाकरीता शहीद जनावांच्या सन्मानार्थ त्यांच्या वीरपत्नी, वीरमाता यांचे पुजन करून साडीचोळी, स्नेहभोजन देण्याचा निर्णय घेतला आहे.२६ जानेवारीला सकाळी झेंडावंदन करून सांयकाळी ७ वाजता बँकेच्या परिसरात अध्यक्ष आ.बच्चु कडू, उपाध्यक्ष अभिजित ढेपे तसेच संचालक मंडळाच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.तत्पुर्वी देशभक्तीमय कार्यक्रमाचे आयोजन होईल. या सन्मान सोहळ्यानंतर वीरपत्नी आणि वीरमाता तसेच सैनिकांना शाहीस्नेहभोजन दिल्या जाईल.

### मोबाईल एटीएमव्हॅन, वेबसाईट इंटरनेट बँकिंग पोर्टलचा शुभारंभ

शेतकऱ्यांना त्यांच्या गावात सुविधा प्राप्त व्हावी याकरीता बँकेच्या वतीने मोबाईल एटीएम व्हॅन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय घरबसल्या बँकींग व्यवहार करण्याकरीता अत्याधुनिक नविन वेबसाईट इंटरनेट बँकिंग पोर्टल तसेच सोशल मिडीया देखील सुरू केले असुन याप्रसंगती याचा शुभारंभ देखील अध्यक्ष, उपाध्यक्षांच्या हस्ते केल्या जाणार आहे.



### सन्मान सोहळ्यालाही विरोधकांचा विरोधच

मंगळवारी संचालक मंडळाची बैठक आयोजित करून ज्या सैनिकांनी देशाकरीता जिवाचे बलिदान दिले अशा सैनिकांच्या वीरपत्नी वीरमातांचा सन्मान करण्याचा ठराव मांडला असता याला विरोधातील संचालकांनी बँकेचे उधळपट्टी करीत असल्याचे दाखवत विरोध केल्याचा आरोप उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांनी यावेळी केला आहे.या कार्यक्रमात केवळ भोजनाचाच खर्च बँकेतुन केल्या जाणार असुन सन्मानाचा सर्व खर्च आम्ही स्वता करू असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# इंदिरा-सेस ॲप डाऊनलोड केले आणि पाहता पाहता ८४ लाख गमावले

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - शेअर बाजारामध्ये गुंतवणुकीवर भरपूर नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची तब्बल ८४ लाख ७९ हजार ४३६ रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली.

शहरातील पंचवटी कॉलनी येथील रहिवासी मोहन उत्तमराव गोहत्रे यांच्याशी एका सायबर लुटारूने समाजमाध्यमाद्वारे संपर्क साधला. शेअर मार्केट समूहाशी जुळण्याचा सल्ला दिला. शेअर बाजारात गुंतवणुकीवर भरपूर नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून इंदिरा-सेस हे प



डाऊनलोड करायला सांगितले. मोहन गोहत्रे यांनी आमिषाला बळी पडून सदर प डाऊनलोड केल्यावर सायबर लुटारूने त्यांना विविध बँक खात्यांमध्ये रक्कम पाठवायला भाग पाडले. अशा प्रकारे त्यांची तब्बल ८४ लाख ७९ हजार ४३६ रुपयांनी ऑनलाइन फसवणूक केली.

खोट्या शेअर बाजारात गुंतवणूक करायला लावून आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर मोहन गोहत्रे यांनी सायबर ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# २८ जानेवारीला मोफत कृत्रिम हात-पाय (कॅलिपर) मोजणी व ऑपरेशन निवड शिबिराचे आयोजन

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक धा. रेल्वे-** माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप मित्र मंडळ धामणगाव, नारायण सेवा संस्थान यांच्या सहकार्यानिहात फाऊंडेशन धामणगाव तर्फे मोफत कृत्रिम हात-पाय (कॅलिपर) मोजणी व शस्त्रक्रिया निवड शिबिराचे आयोजन

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या टी.एम.सी.सभागृहात येत्या २८ जानेवारीला सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.शिबीराचे उद्घाटन माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या हस्ते होणार आहे.या शिबिरात शारीरिक अपंग व्यक्तींची मोफत हात आणि पाय मोजणी केली जाणार व डॉक्टरांनी दिलेल्या मोजमापाचे कृत्रिम अंग हे पुढील कार्यक्रमात (६० ते ९० दिवसां नंतर) वितरण करण्यात येणार. मोफत तपासणीसाठी सहभागी होणाऱ्यांनी त्यांचे आधार कार्ड आणि अपंग प्रमाणपत्र ओरिजनल व झेरॉक्स सह आणणे आवश्यक आहे.नोंदणी साठी हात फाऊंडेशन धामणगावचे सुजित भजभुजे ९६६५२९०४९५,दिनेश वाघमारे ८४५९२०८९२२,निलेश नांदने ९५०३०७३८८० यांच्याशी संपर्क करावा,असे आवाहन धामणगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज वानखडे, चांदुर रेल्वे धामणगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमोल होले ,नांदगाव खंडेश्वर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष निशिकांत जाधव यांनी केले आहे.



# आमदार ॲड यशोमती ठाकूर यांचे महिला सक्षमीकरण आणि विकास रथ

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** अमरावती जिल्ह्यातील तिवसा मतदार संघातील काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदार एडवोकेट यशोमती ठाकूर यांनी वाठोडा शुक्लेश्वर या भातकुली तालुक्यातील गावात महिला सक्षमीकरणाचे धडे हळदी कुंकू कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना दिले. तर भातुकली तालुक्यातील विविध गावांमधील विकास कार्यक्रमांचा शुभारंभ ही जोरदार केला. भातकुली तालुक्यातील वाठोडा शुक्लेश्वर या गावात उपसरपंच मायाताई बोरघाटे यांनी आयोजित केलेल्या हळदीकुंकू कार्यक्रमाला आमदार ॲड यशोमती ठाकूर यांनी आवर्जून उपस्थिती दर्शवली. यावेळी उपस्थित महिलांना महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या विविध योजना आणि महिलांनी एकत्र येऊन नेमका कोणत्या गोष्टी सुरू करता येतील , कशा पद्धतीने वैयक्तिक आणि सामूहिक विकास साधता येईल, याबाबत ॲड ठाकूर यांनी यावेळी महिलांना मार्गदर्शन केले. तसेच महिलांना सतवणाऱ्या विविध प्रश्नांबाबत त्यांनी यावेळी महिलांशी संवाद साधला महागाईचा प्रश्न आणि सिलेंडरच्या वाढलेल्या किमती याविषयी महिलांनी यावेळी नाराजी व्यक्त केली.






यावेळी प्रीती साखरे यांना संगीत खुर्ची स्पर्धेतील पहिला क्रमांक बाबत तर उखाणे स्पर्धेतील पहिल्या क्रमांकाबाबत सौ कविता यांना आमदार ॲड ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. दरम्यान तळेगाव ठाकूर येथेही हळदीकुंकू चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता विशेष म्हणजे परी हु मै या महिलांसाठी विशेष कार्यक्रमाचे यावेळी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्मरणशक्ती म्हणजे मेमरी स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत रजनी महेश मस्के याना पहिला क्रमांक प्राप्त झाला. तर कलर मॅचिंग स्पर्धेमध्ये प्रीती विशाल गायधने या विजयी झाल्या तर एक मिनिट भाषण स्पर्धा या स्पर्धेत कविता पिंटूभाऊ भोगे या विजयी झाल्या या सर्व विजेत्यांना आमदार ॲड ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

दरम्यान, आमदार ॲड यशोमती ठाकूर यांच्या हस्ते वाठोडा शुक्लेश्वर येथील हनुमान मंदिर जवळ येईल ग्रामपंचायतच्या खुल्या जागेवर सभागृहाच्या बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला यासाठी वीस लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे वाटोळा शुक्लेश्वर येथील हरीश रहमान ते शेख सुलेमान यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार असून यासाठी चार लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत तसेच शेख गुफ्राण ते अनिसुद्दीन यांच्या घराकडे जाणाऱ्या काँक्रीटच्या रस्त्यासाठीही चार लाख रुपये मंजूर करण्यात आले असून या कामांचा शुभारंभ करण्यात आला अब्दुल रहमान ते शेख नईमुद्दीन यांच्या घराकडे जाणाऱ्या काँक्रीट रस्त्यासाठी ही चार लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे तर वाठोडा शुक्लेश्वर येथील वार्ड क्रमांक पाच मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ ग्रामपंचायत जागेवर सभागृहाच्या बांधकामासाठी आठ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून कामाचा शुभारंभ करण्यात आला तसेच वाठोडा शुक्लेश्वर म्हैसूर रस्त्याची सुधारणा करण्यात येणार असून यासाठी तीन कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून याही कामाचा आमदार ॲड ठाकूर शुभारंभ करण्यात आला. यावेळी श्रीकांत भाऊ बोंडे, हरिभाऊ मोहोळ, मुकद्दर खान जब्बार खान पठाण, जयंतराव देशमुख , रिजवान अब्दुल गफार अमोल भाऊ महात्मे, रमेशराव थोरात, डॉक्टर नईम शेख, जमील अहमद अब्दुल गणी, बाबाराव महात्मे, मुकुंदराव बुरघाटे, बाबाराव मांगे, सुमय्या परवीन अलीमुद्दीन, दीपक जवंजाळ ,सुर्वता ताई थोरात आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वोच्च न्यायालय कोणाच्या शब्दावर चालतंय ?

## नवनीत राणांच्या जात प्रमाणपत्र प्रकरणी कॅप्टन अडसूळांचा सवाल



**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक दर्यापुर-** खासदार नवनीत राणा यांच्या खोट्या जात प्रमाणपत्र प्रकरणाचा निकाल का प्रलंबित आहे ? सर्वोच्च न्यायालय कोणाच्या शब्दावर चालतंय ? असा सवाल माजी आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ यांनी उपस्थित करीत महायुतीचा घटक बनलेल्या राणांवर टीका करीत सरकारला घरचा आहेर दिला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करणाऱ्या अंगणवाडी सेविकांच्या आंदोलनाला बुधवारी (ता. २४) भेट दिल्यावर ते पत्रकारांशी बोलत होते. त्यांच्या या विधानामुळे पुन्हा एकदा अडसूळ विरुद्ध राणा अशी जुगलबंदी रंगण्याचीचर्चा राजकीय वर्तुळात आहे. खासदार नवनीत राणा यांची जात वैधता प्रमाणपत्राचे प्रकरण गेल्या वीस महिन्यांपासून सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यामुळे त्यांच्या या प्रकरणावर आता वेगवेगळे वक्तव्य यायला सुरुवात झालेली आहे. दुसरीकडे एनडीएचे घटक असलेल्या नेत्यांनीही आता नवनीत राणा यांच्या विरोधात भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. राणा यांच्या विरोधात शिंदे गटाच्या शिवसेनेने दंड थोपटले आहे. १६ आमदारांचा निकाल लागतो. मात्र, गेल्या २० महिन्यांपासून खासदार नवनीत राणा यांच्या प्रकरणाचा निकाल लागत नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय कोणाच्या शब्दावर चालतंय? असा सवाल अभिजीत अडसूळ यांनी उपस्थित केला. त्यामुळे आता जिल्ह्यात पुन्हा एकदा राणांविरुद्ध अडसूळ असा सामना पाहायला मिळत आहे.

# विभागस्तरीय नोडल अधिकारी प्रशिक्षण; निवडणूक संदर्भात प्रशिक्षकांमार्फत मार्गदर्शन

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूकीशी संबंधित अमरावती विभागातील जिल्हा नोडल अधिकारी यांचा प्रशिक्षण कार्यक्रम आज जिल्हा नियोजन सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील विविध विषयावर प्रशिक्षकाव्दारे यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे तसेच विभागातील सर्व नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूकीच्या संबधित अमरावती विभागातील अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. या नोडल अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील प्रशिक्षण देण्याचे निर्देश विभागीय आयुक्त यांनी दिले होते. त्याअनुषंगाने आज एक दिवसाचे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षण कार्यशाळेची सुरुवात सकाळी १० वाजेपासून झाली. यात निवडणूक प्रक्रिया पूर्व आणि पश्चात सादरीकरणाव्दारे नियमावलींसह सांगण्यात आली.पहिल्या टप्प्यात अकोला येथील उपविभागीय अधिकारी शरद जावळे यांनी आचारसंहिता लागू झाल्यानंतर उमेदवारांचे नामांकन अर्ज, पात्र व अपात्रतेची छाननी, उमेदवारी मागे घेणे, चिन्ह वाटप अशा विविध विषयाबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर मुर्तिजापूर उपविभागीय अधिकारी संदीप अपार यांनी जिल्हा निवडणूक व्यवस्थापन आराखडा, मतदान केंद्राची निवड, केंद्रावरील व्यवस्था, सोयीसुविधा तसेच निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांची व्यवस्था, पोलिंग पार्टी व्यवस्था आदीबाबत माहिती दिली.



प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यात उपविभागीय अधिकारी शैलेश काळे यांनी आदर्श आचारसंहिता खर्चाचे निरीक्षण, मीडिया तक्रार, एमसीएमसी समिती व पेड न्यूजबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जळगाव जामोदचे उपविभागीय अधिकारी शैलेश काळे यांनी ई- रोल, इरो नेट, स्वीप व आयटी प्लीकेशनबाबत माहिती दिली. तर प्रशिक्षणाच्या शेवटच्या टप्प्यात अचलपूरचे उपविभागीय अधिकारी संजय गारकर यांनी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट, मतमोजणी आणि निकालाची घोषणा, पोस्टल बॅलेट व इटीबीपीएस याबाबत मार्गदर्शन केले.

# चाचा नेहरू बाल महोत्सवात झाली निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा

## ३५ विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताकअमरावती-** महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग अंतर्गत जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव २०२४ अंतर्गत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती च्या प्रांगणामध्ये विविध खेळ खेळण्यात आले त्याचप्रमाणे मुलांच्या बुद्धीला चालना मिळावी यासाठी चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धा नेताजी सुभाष चंद्र बोस हॉल येथे घेण्यात आल्या. चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धा वयोगट ६ ते १२ व १२ ते १८ या दोन गटांमध्ये घेण्यात आल्या असून यामध्ये जिल्ह्यातील विविध बालगृहांचे विद्यार्थी सहभागी झाले. निबंध स्पर्धेचे संचालन शिक्षक श्री सुशील शिवपाल डोंगरदिवे यांनी केले. चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धे करिता लागणारे साहित्य शासनातर्फे पुरविण्यात आले होते. याप्रसंगी श्रीमती मेघा महात्मे जिल्हा परिविक्षा अधिकारी, अजय डबले, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जितेंद्र चौधरी विधी अधिकारी, भूषण कावरे परिविक्षा अधिकारी, सीमा भाकरे विधी सल्लागार, आकाश बरवट समुपदेशक, कीर्ती सगणे डीसीपीयु, नम्रता कडू डीसीपीयू श्री वैराळे लेखापाल उपस्थित होते. निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा करिता परीक्षक म्हणून श्रीमती प्रतिभा हरिश्चंद्र राठोड शिक्षिका, जिल्हा परिषद (माशा) माध्यमिक मुलांची शाळा सायन्स कोर अमरावती यांनी काम पाहिले.

# विद्यापीठात पंधरा दिवसात लोकपाल नियुक्त करा

## युवासेनेचा विद्यापीठ प्रशासनाला आंदोलनाचा इशारा

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती –** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी देशातील सर्वच विद्यापीठांना लोकपाल व विद्यार्थी तक्रार निवारण समिती नियुक्त करण्याचे आदेश दिले होते. परंतु, एक वर्ष उलटूनही संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामध्ये लोकपाल नियुक्त झालेले नाहीत. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने १७ जानेवारी रोजी विद्यापीठाला डिफॉल्टर यादीत टाकले आहे. त्यामुळे विद्यापीठाने पंधरा दिवसात लोकपाल नियुक्त न केल्यास युवासेनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. यासंदर्भातील निवेदनही बुधवारी कुलसचिव तुषार देशमुख यांना दिले आहे.

विद्यापीठांमध्ये दिवसेंदिवस विद्यार्थ्यांच्या वाढत्या तक्रारी व नसलेली प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा यावर तोडगा म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने ११ एप्रिल २०२३ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी देशातील सर्व विद्यापीठांना



लोकपाल व विद्यार्थी तक्रार निवारण समिती नियुक्त करण्याचे आदेश दिले होते. परंतु, विद्यापीठाने अजूनही लोकपाल नियुक्त केले नाहीत. याबद्दल युवासेनेने जाब विचारला. विद्यापीठ प्रशासनाकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याचे युवासेनेचे म्हणणे आहे. यावेळी युवा सेना महाविद्यालयीन कक्षाच्या टीमने विद्यापीठ प्रशासनास पंधरा दिवसांच्या आत विद्यापीठांमध्ये लोकपाल नियुक्त करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

पंधरा दिवसांनंतरही लोकपाल नियुक्त न झाल्यास शिवसेना स्टाइल आंदोलनाचा इशारा युवासेना कार्यकर्त्यांनी दिला आहे. यावेळी युवासेना शहरप्रमुख योगेश सोळंके, उपजिल्हाप्रमुख प्रथमेश नवरखेडे, उपजिल्हाप्रमुख पार्थ हरमकर, उपशहर प्रमुख भाविक कांबळे, साहिल ढोले, वेदांत दांडगे, तेजस गडलिंग, आयुष पाटील, विशाल दांडेकर, गौरव पावडे, अनिकेत चावरे, आयुष कुरळकर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### अयोध्यातील विशेष आमंत्रित

# मठाधिपती स्वामी जितेंद्रनाथ महाराज यांचे तिर्थक्षेत्र लखपुरी येथे भव्य स्वागत

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

**दर्यापूर–** दर्यापूर व मुर्तीजापुर पूर्णा नदीच्या पवित्र स्थस्डी लाखपुरी येथे प्रभु श्रीराम यांच्या मूर्तीचा अयोध्या येथे भव्य मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्त विशेष आमंत्रित मठाधिपती प.पू .श्री जितेंद्रनाथ महाराज अयोध्या येथुन अकोला येथील कार्यक्रम करून लखपूरी मार्गे दर्यापूर , अंजनगाव येथील कार्यक्रमाला जात असताना तिर्थक्षेत्र लाखपुरीतील रेल्वे गेट जवळ श्री लक्षेक्ष्वर संस्थान , मूर्तिजापूर



तालुका राष्ट्रीय स्वयंसेवक संघ , विश्वहिंदू परिषद, बजरंग दल पदाधिकारी व भक्तगण यांनी बुधवारी दुपारी महाराजांचे जंगी स्वागत करून सत्कार केला व आशीर्वाद घेतले जितेंद्रनाथ महाराजांचे आगमन होताच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली व ढोल ताशांच्या गजरात स्वागत करून सत्कार करण्यात. आले . यावेळी प्रकाश मोरे , महादेवराव नाचने , बबलू ढोक , अमित कंझरकर , बाप्पू मोरे , राजाभाऊ बळे, राजु दाहापुते, तुळशीराम वरनकर , मंगेश आंबेकर ,पंकज किडे , रविद्र पारधी , पप्पू शुक्ला ,ओम बनभेरू, दत्ता गव्हाळे, लादू महाराज , प्रेम कैथवास , राधेश्याम राठी , नरेंद्र बोदडे,राजेश चोरे , सुभाष ठाकूर , चिंटू पत्की ,देविदास चव्हाण , श्रीकांत देशमुख ,अक्षय अवघड , संतोष जोगी ,प्रवीण सुरदुसे , राष्ट्रपाल कोकने , गौरव दहापुते , शुभम उघडे , शुभम सातरॉटे यांच्या सह लक्षेक्ष्वर संस्थानचे युवा सेवाधारी उपस्थित होते. प.पू. जितेंद्रनाथ यांनी आपले मनोगत व्यक्त अयोध्येतील महत्व सांगितले .

# रोहित पवार यांची तब्बल १२ तास ईडीकडून चौकशी

## १ फेब्रुवारीला पुन्हा बोलावले

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांची बुधवारी सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) अधिकाऱ्यांनी तब्बल १२ तास चौकशी केली. सकाळी साडेदहाच्या सुमारास ते ईडीच्या बॅलॉर्ड पीअर येथील कार्यालयात दाखल झाले. त्यानंतर रात्री सव्वादहाच्या सुमारास ते ईडी कार्यालयातून बाहेर आले. यावेळी खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.पवार बाहेर येताच कार्यकर्त्यांनी जल्लोष



करत त्यांना खांद्यावर उचलून घेतले. दिवसभर शेकडो कार्यकर्ते ईडीच्या कार्यालयाबाहेर ठाण मांडून होते. १ फेब्रुवारी रोजी त्यांना ईडीने पुन्हा चौकशीसाठी बोलवले आहे. हे प्रकरण महाराष्ट्र राज्य सहकारी शिखर बँकेत झालेल्या कथित आर्थिक घोटाळ्याशी संबंधित आहे. या प्रकरणी ५ जानेवारी रोजी ईडीच्या अधिकाऱ्यांनी रोहित पवारांच्या बारामती ग्रो कंपनीसह सहा ठिकाणी छापेमारी केली होती. मी ईडीला सहकार्य करत होतो आणि पुढेही करत राहणार. १२ तास चौकशी चालू होती, अनेक लोक थकतात, पण मी तिथे बसलो होतो तेव्हा तुमचा आवाज माझ्यापर्यंत पोहोचत होता, त्यातून मला प्रेरणा मिळत होती. आपला कार्यकर्ता जेव्हा अडचणीत येतो तेव्हा पवार साहेब इथे येतात. ते संधी देतात आणि कार्यकर्ता जेव्हा अडचणीत येतो तेव्हा बाप म्हणून ते पाठीशी उभे राहतात. असे रोहित पवार म्हणालेत.

### अकोला जिल्ह्यातील कुरुम च्या

# दुचाकी चोरट्या कडून २८ दुचाकी जप्त



**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

कोतवाली पोलिसांच्या पीसीआरमध्ये असलेला कुरूमचा सराईत चोर संतोष बोबडेने आणखी ५.५० लाख रूपये किमतीच्या ११ दुचाकी चोरीची कबूली दिल्याने पोलिसांनी अकोला, यवतमाळ, अमरावती जिल्हयातील ग्रामीण भागातून सर्व ११ दुचाकी जप्त केल्या.

संतोष देवराव बोबडे (३८), रा.कुरूम, ता.मुर्तिजापुर असे अटकेतीलआरोपीचे नाव आहे. कोतवाली ठाण्यातील डीबीस्कॉडचे प्रमुख एएसआय रंगराव जाधव यांनी त्यांच्या पथकातील कर्मचारी मलीक अहमद, आशिष इंगळेकर, प्रमोद हरणे, पंकज अंभोरे, आनंद जाधव यांनी २१ जानेवारीला कॉटन मार्केट चौकातून संतोष बोबडेला संशयाच्या आधारावर अटक केली. परंतु, चौकशीदरम्यान त्याच्याकडून दुचाकी चोरीचे घबाड निघाले. त्यानंतर पोलीस संतोषच्या कुरूम येथील घरातून सहा व उर्वरित ग्रामीणभागातील लोकांना विकलेल्या १७ दुचाकी जप्त केला.

कोतवाली पोलिसांनी पीसीआर मध्ये – असलेल्या संतोषची दिमाखदार पध्दतीने – चौकशी केली असता त्याने अकोला, – अमरावती, यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात ११ दुचाकी विकल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याला दोन दिवस फिरवणूक त्या दुचाकी जप्त केल्या. अशा प्रकारे पोलिसांनी आत्तापर्यंत संतोष कडून १२ लाख ५० हजार रूपयांच्या २८ दुचाकी जप्त केल्या आहेत.

# स्कॉटलँडमध्ये अमरावतीचा अनिरुद्ध विद्यार्थी संस्थेचा अध्यक्ष

## जातिभेद निर्मूलनाकरिता पहिल्या आंबेडकराइट विद्यार्थी संस्थेची स्थापना

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती :** जागतिक पातळीवर प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या स्कॉटलँड देशातील एडिनबर्ग विद्यापीठामध्ये पहिल्या आंबेडकरवादी विद्यार्थी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. जागतिक पातळीवर वर्ण आणि वर्ग भेदासह जातिभेदसुद्धा तेवढाच गंभीर मुद्दा आहे. त्यामुळे विविध शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जात व त्याच्यासोबत निगडित पैलूंवर विद्यार्थ्यांना जागरूक करून जातिभेद निर्मूलनाकरिता त्यांना कृतिशील बनविण्याच्या मुख्य उद्देशातून या विद्यार्थी संस्थेची स्थापना करण्यात आली असून या संस्थेच्या अध्यक्षपदी अमरावतीचा मूळ रहिवासी असलेल्या अनिरुद्ध महाजन या विद्यार्थ्याची अध्यक्षपदी निवड करण्यात आली



आहे. एका युरोपीय देशातील पहिली आंबेडकरवादी संस्था स्थापित करण्यामागे अनिरुद्ध महाजनचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे संपूर्ण अमरावती व विदर्भवासीयांसाठी व सोबतच समस्त बहुजनवादी समुदायासाठी ही आनंदाची व अभिमानाची बाब आहे. विशेषत: मागील वर्षीच अनिरुद्ध महाजन याला एडिनबर्ग विद्यापीठामध्ये पीएच.डी. करण्यासाठी ब्रिटिश सरकारने तब्बल दीड कोटी रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान केली होती.

'आंबेडकराइट सोसायटी ऑफ एडिनबर्ग' या संस्थेचा मुख्य उद्देश विद्यार्थी व नागरिकांना केवळ जातीसंदर्भात जागरूक आणि कृतिशील बनविण्यापर्यंत मर्यादित नसून त्याही पलीकडे जाऊन जातिभेद व वर्णभेद या दोनही जटिल समस्येविरुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर व डॉ. डू. बॉईस यांच्या प्रेरणेने सामूहिक लढा उभारण्याचा असल्याचे मत नवनिर्वाचित कार्यकारी समितीने व्यक्त केले. स्कॉटलँड देशाच्या इतिहासात जाती व वर्णभेदाविरुद्ध सामूहिक लढ्याच्या उद्देशाने स्थापित करण्यात आलेली ही पहिलीच संस्था असल्यामुळे ही अतिशय ऐतिहासिक घटना मानली जात आहे.

# जिल्हा परिषदेच्या पाच संवर्गांचा निकाल जाहीर १९ संवर्गाचा बाकी, उर्वरित निकालाकडे लक्ष

## जिल्हा परिषदेत विविध संवर्गाच्या ६५८ पदांसाठी २५ हजारांवर अर्ज दाखल

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती:** मिनी मंत्रालयातील क वर्गातील पदभरती प्रक्रियेत तीन महिन्यांनंतर रिंगमन, वरिष्ठ सहायक लेखा, विस्तार अधिकारी सांख्यिकी, विस्तार अधिकारी कृषी आणि आरोग्य पर्यवेक्षक अशा पाच संवर्ग परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. परीक्षा निकालाची गुणवत्ता यादी जिल्हा परिषदेने आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.

दरम्यान, परीक्षा झालेल्या २४ संवर्गापैकी आतापर्यंत ५ संवर्गाचा निकाल जाहीर झाला असला तरी १९ संवर्गाचे निकाल अद्याप जाहीर झालेले नाहीत, तर पाच संवर्गाची परीक्षा अद्याप झालेली नाही.




अमरावती जिल्हा परिषदेत विविध संवर्गाच्या ६५८ पदांसाठी २५ हजारांवर अर्ज दाखल झाले होते. नियोजनाअभावी अनेकदा परीक्षा लांबणीवर पडली.त्यामुळे पुढील तीन महिन्यांत टप्प्याटप्प्याने विविध संवर्गाच्या परीक्षा घेण्यात आल्या. त्यानंतर आता बहुप्रतीक्षेनंतर पाच संवर्गाचा निकाल जाहीर झाला आहे. ही परीक्षा 'आयबीपीएस' कंपनी घेण्यात येवून निकाल जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीकडे सुपुर्त केला. त्यानुसार हा निकाल जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. परीक्षा झालेल्या उर्वरित पदांच्या निकालाकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, निकाल जाहीर झाल्यावर आता निवड समितीच्या मान्यतेने कागदपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहे. त्यानंतर नियुक्तीपत्रे दिली जाणार आहेत. उमेदवारांनी कुठल्याही भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, सामान्य प्रशासनाचे डेप्युटी सीईओ डॉ. कैलास घोडके यांनी केले आहे.

# २७ जानेवारी रोजी पहाटे सूर्योदयापूर्वी मंगळ आणि बुध ग्रह जवळ येणार, पूर्व क्षितीजावर अपूर्व अनुभूती

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अकोला :–** सूर्यमालेत सूर्याला सर्वात जवळ असलेला बुध ग्रह आणि पृथ्वी नंतरचा मंगळ ग्रह २७ जानेवारी रोजी पहाटे सूर्योदयापूर्वी पूर्व क्षितिजावर युतीच्या रुपात नुसत्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. या अनोख्या दृष्याचा आनंद घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले.

चंद्र आकाशात दररोज १२ अंश पुढे सरकत असल्याने दर महिन्याला प्रत्येक ग्रहाची आणि चंद्राची युती घडून येते. त्यामुळे आकाशात ग्रहाची ओळख सहज होत असते. चंद्राप्रमाणेच ग्रहसुद्धा ठराविक



कालावधीत एकमेकांच्या जवळ येतात. बुध ग्रह सूर्याच्या जवळ आणि अंतर्ग्रह असल्याने केवळ सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर फार कमी वेळ या ग्रहाचे दर्शन घडते. दुर्बिणीतून या ग्रहाच्या चंद्राप्रमाणे विविध कला पाहता येतात. सध्या एकादशीच्या कलेप्रमाणे दिसेल. आकाशात लालसर रंगाचा मंगळ ग्रह लवकर लक्षात येत असल्याने त्याच आधारे बुध ग्रहाचे दर्शन अधिक सुलभ होईल, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले.हे दोन्ही ग्रह सध्या धनु राशीत २२ व्या अंशावर आहेत. रात्री १० वाजता या दोन ग्रहांमधील अंतर सर्वात कमी असेल. असा हा अनोखा आकाश नजारा प्रत्येकाने आपल्या डोळ्यात साठवावा. याच प्रकारे मंगळ ग्रह येत्या २२ फेब्रुवारी रोजी शुक्र ग्रहाजवळ असेल, अशी माहिती प्रभाकर दोड यांनी दिली.



# अयोध्येतील 'रामरज कलश' उद्याला अमरावतीत

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

पाचशे वर्षाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर प्रभू रामलल्ला विधीपूर्वक अयोध्यातील मंदिरात विराजमान झाले. या ठिकाणी त्यांची भव्य दिव्य प्राणप्रतिष्ठा करण्यात आली, याच प्राणप्रतिष्ठेच्या ठिकाणची माती (रामरज) कलश अमरावतीकरांच्या दर्शनासाठी आणला जात आहे. श्री जगदुरु रामानंदचार्य स्वामी श्री राजेश्वर माऊली सरकार ते 'रामरज कलश' घेऊन निघाले आहेत. या कलशात राम मंदिर ज्या ठिकाणी बांधण्यात आले आहे, तेथील मातीसह शरयूघाट, संत निवास, हनुमान गढी व अखंड रामायण पाठस्थळ अश्या पाच



पावन तीर्थांची पवित्र माती आहे. शुक्रवार २६ जानेवारीला हा 'रामरज कलश' अमरावतीत पोहचेल.सदर 'रामरज कलश' हा जबलपूर, नागपूर, तिवसा मार्गे अमरावतीत आणला जात आहे. या मार्गात ठिकठिकाणी भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या माध्यमातून सगळ्यांना अयोध्येच्या पावन भूमीचे दर्शन होणार आहेत. ही माती जिल्ह्यातील सर्व मंदिरांना वितरित केली जाईल.

श्री जगदुरु रामानंदचार्य स्वामी राजेश्वर माऊली यांना अयोध्यातील राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टकडून विशेष निमंत्रित करण्यात आले होते. दरम्यान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ तसेच राम मंदिर अध्यक्ष महंत नृत्य गोपालदास यांची व त्यांची भेट झाली. त्यावेळी महाराष्ट्रातील मंदिर व देशातील मंदिर संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली.

### अंबानगरीतून नेलेले कुंकू रामलला चरणी अर्पण

सकल हिंदू समाजातर्फे अंबानगरी ते अवध तेरा तुझको अर्पण या अंतर्गत अमरावतीतून ५०० किलो कुंकू अयोध्येला पाठवण्यात आले होते. हे कुंकू श्री जगदुरु रामानंदचार्य स्वामी श्री राजेश्वर माऊली सरकार यांनी रामलला चरणी एक कळस कुंकू अर्पण केली. उर्वरित पाचशे किलो कुंकू हे राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टला सुपूर्द करण्यात आले आहे.

# अंबापेठ क्रीडा मैदानावर राम भक्तांकडून दिव्यांची आरास

## भव्य शोभायात्रेत नागरिकांचा सहभाग

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**



पाचशे वर्षांच्या अविरत संघर्षानंतर अयोध्येच्या भव्य मंदिरात प्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानिमित्त देशभरात उत्साह अतिशबाजीचे वातावरण पहायला मिळाले. याच क्रमात स्थानिक अंबापेठ क्रीडा मैदानावर ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड.प्रशांत देशपांडे यांच्या पुढाकारात प्रभू श्रीरामचंद्रांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा रामभक्तांनी ऐतिहासिक आनंदोत्सव साजरा केला. असंख्य दिव्यांची आरास मांडून प्रभू श्रीरामचंद्रांची यावेळी आराधना करण्यात आल्याने परिसर राम नावाच्या जयघोषाने न्हावून निघाला.

प्रभू श्री रामचंद्रांच्या आगमनाप्रित्यर्थ अंबापेठ क्रीडा मंडळाच्या वतीने आंबापेठ येथून प्रभू श्री रामचंद्रांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. हनुमान मंदिर, गोपाल कृष्ण मंदिरास आदी स्थानांसह विविध ठिकाणांहून ही यात्रा मार्गस्थ झाली. रुद्रावतार वादन पथकाच्या माध्यमातून रामभक्तांनी प्रभू श्री रामचंद्रांच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा अभूतपूर्व जल्लोष केला. रामधुन काढण्यात आली. असंख्य दीप प्रज्वलित करण्यात आले. चैतन्यमयी व उत्साही वातावरणात रामरक्षा स्त्रोत पठण करण्यात आले. प्रभू श्री रामचंद्रांचा यावेळी जयघोष करण्यात आला. आनंद व उत्साहपूर्ण वातावरणात संपूर्ण परिसर हा न्हावून निघाला होता. कारसेवक विकास चौधरी, अरुण गुडधे, अनिल अंबाडकर, विजय मोहरील, जयंत यादगिरे, शेखर जगदाळे आदींना शॉल, श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. प्रभू श्री रामचंद्रांची आरती देखिल विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. प्रसादाचे वितरण करण्यात आले. या ऐतिहासिक कार्यक्रमाला महाकाली शक्ती पिठाचे पिठाधीश्वर शक्ती महाराज यांनी उपस्थित राहून प्रभू श्रीरामचंद्रांचे दर्शन घेतले. त्यांनी रामभक्तांना आशीर्वाद दिले. यावेळी ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ड.प्रशांत देशपांडे, मनीष जोशी, राजेश जयपुरकर, संदीप नावंदर, प्रवीण वैश्य, महेश सबनीस, राम भागवत, गजानन वैश्य, भास्कर टोम्पे, राहुल कुळकर्णी यांच्यासह तारासाहेब बगीच्या महिला मंडळ, अंबापेठ महिला मंडळ तसेच विविध नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी होत यशस्वी आयोजनाकरिता परिश्रम घेतले

# आठवणीत रंगला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा : राजुरवाडी विद्यालयाचे विद्यार्थी चाळीस वर्षानंतर शेगावात भेटले

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**
**मोर्शी**

तालुक्यातील राजुरवाडी इथल्या भारतीय विद्यालय माजी विद्यार्थ्यांचा स्नेहा मिलन सोहळा शेगाव येथे नुक्ताच पार पडला, १९८३ च्या वर्गातील हे विद्यार्थी तब्बल ४० वर्षानंतर एकत्र आल्याने त्यांच्या आनंदाचा कोणताही पारा नव्हता, १९८३ पर्यंत १ ते १० एकत्र असलेले परंतु नंतर



विखुरलेल्या सगळ्यांना एकत्रित आणण्याचा योग रेखा कुरवाळे व संध्या बोंडे यांनी जुळवून आणला, त्या क्षणाचा प्रत्येकाच्या चेह-यावरील ओसांडून वाहणारा आनंद अवर्णनीय असाच होता . कार्यक्रमाच्या सुरवातीला सगळ्यांनी स्वतःचा व कुटुंबाचा परीचय दिला. शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत काही क्षणासाठी पुन्हा विद्यार्थी जीवनाचा अनुभव घेतला. शिक्षिका कल्पनाने मैत्रीला साजेशी कविता सादर केली. सुनिल अन् उमाने भजनं गायलीत तर खोडकर स्वभावाच्या संजयने मनोगत सांगून सगळ्यांना खळखळून हसवले.रविंद्र अन् अल्काने सदाबहार अशी हिंदी गाणी म्हटली. लहानपणी शाळेत मकरसंक्रांतीच्या वाणासाठी पीना देणार की रबर म्हणून एकमेकींशी भांडणा-या मैत्रिणींनी मकरसंक्रांतीचं औचित्य साधून छोटेखाणी हळदीकुंकू समारंभ आयोजित केला. असा अविस्मरणीय स्नेह मिलन सोहळा शेगाव येथे आयोजित करण्यात आला होता, या मेळाव्याला नितीन जोशी, संजय ठाकरे, सुनिल भुयार, रविंन्द्र घावट,सुरेश झोलेकर, कल्पना देशमुख ,अल्का विघ्ने, उमा तापडिया, गिता कडू, संध्या ठाकरे ,श्री.नान्हे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# ७ हजार ८०० शेतकऱ्यांचे अनुदान 'केवायसी'त अडकले

## पीएम किसान सन्मान योजना; शेतकऱ्यांना प्रतीक्षा

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान योजनेंतर्गत वार्षिक ६ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. आतापर्यंत २ लाख ६१ हजार ११२ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे. परंतु, ७ हजार ८४५ शेतकऱ्यांचे अनुदान हे केवायसीत अडकले आहे. या शेतकऱ्यांना अनुदानाची प्रतीक्षा लागली आहे.

केंद्र शासनाकडून सन २०१९ मध्ये पीएम किसान सन्मान योजनेंतर्गत६ हजार रुपये अनुदान सुरू केले आहे. हे अनुदान त्यांना वर्षातून चार महिन्यानंतर तीन टप्यात २



हजार रुपयांप्रमाणे दिले जाते. आतापर्यंत १५ ते १६ टप्यात सदरचे अनुदान शेतकऱ्यांना देण्यात आले आहे. जिल्ह्यात याकरिता २ लाख ७९ हजार ४५८ शेतकरी पात्र करण्यात आले असताना यातील २ लाख ७१ हजार ६१३ शेतकऱ्यांची केवायसी पूर्ण झाली तर ७ हजार ८४५ शेतकऱ्यांचे अद्यापही केवायसी पूर्ण करण्यात आली नाही. त्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदानाची प्रतीक्षा लागली आहे. यामध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सर्वाधिक ९७२ शेतकऱ्यांचे केवायसी प्रलंबित आहे. त्या पाठोपाठ भातकुली तालुक्यातील ८६८, दर्यापूर ८४०, अंजनगाव सुर्जी ८३७, चिखलदरा ७१८, धामणगाव रेल्वे ७०६, अचलपूर ३६९, अमरावती २९९, चांदूर रेल्वे ३४६, चांदूरबाजार ४९५, धारणी १६८, मोर्शी ४३०, तिवसा ३५९ व वरूड तालुक्यातील ४३८ शेतकऱ्यांचे केवायसी प्रलंबित आहे. सद्यस्थितीत २ लाख ६१ हजार ११२ शेतकऱ्यांना अनुदान मिळत आहे.

# भातकुली तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रिडा महोत्सवाचे थाटात शुभारंभ

## क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम सुरुवात

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

जि.प.शाळेच्या विद्यार्थांमध्ये आमदार, खाजदार, अधिकारी होण्याची पात्रता आहे.ग्रामिण भागातील जि.प.शाळा मधिल शिक्षक आजही आपले विद्यार्था उत्काष्ट घडवत आहे.त्यांच्या कलांना चालना देत आहे.आजचा सांस्कृतिक कार्यक्रम पाहुन मला माझ्या जि.प.शाळांचा अभिमान आहे.शाळा व विद्यार्थी यांच्या करीता लागणारी शैक्षणिक व भौतिक सुविधा या करीता आणि शाळा दुरुस्ती करीता लागणारी मदत मी आपल्याला देणार आहे असे मनोगत बडनेरा मतदार संघाचे आमदार रविभाऊ राणा यांनी भातकुली तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रिडा महोत्सवाच्या वायगाव येथे आज उद् घाटन प्रसंगी व्यक्त केले.हा क्रिडा महोत्सव २४व२५ जानेवारीला होत आहे. या दोन



दिवसीय क्रिडा महोत्सवाचे उद् घाटन बडनेरा मतदार संघाचे आमदार रविभाऊ राणा यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष वायगावचे सरपंच्या शांताबाई गाडे होत्या तर प्रमुख अतिथी उपसरपंच अभय देशमुख,गटविकास अधिकारी डॉ.प्रफुल्ल भोरखडे, उपशिक्षणाधिकारी बृध्दभूषन सोनोने,गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे, शा.पो. आ. अधिक्षक नरेंद्र गायकवाड, शिक्षण विस्तार अधिकारी संतोष घुगे, ब्रम्हानंद जवजाळ, संतोष भांडे, रोशन झासकर, रुपेश कळसकर,नरेंद्र जवजाळ, धमेंद्र इंगोले,किशोर अघम, गजानन काळे,दिलीप भलावी, किरण बनसोड,मनोहर भांडे, डॉ.आनंद उल्हे,माधव ठाकरे, शिक्षक बॅक संचालक उमेश चुनकीकर, मुख्याध्यापक दिनेश लांडगे उपस्थित होते. मान्यवरांनी फोटो पुजन,दिप प्रज्वलन,क्रिडाध्वज आणि क्रिडा ज्योत प्रज्वलीत करून उद् घाटन केले.यावेळी मान्यवरांचा शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.वायगाव शाळेच्या मुलांनी सुमधुर स्वागत गीत सादर केले.जि.प.पूर्व माध्य.शाळा शिवणी बु.,वाकी रायपूर,म्हैसपूर,वायगाव यांनी उत्कृष्ट निदर्शन सादर केले.उद् घाटनीय माध्य.मुलांचा कबड्डी सामना आसरा विरुध्द आष्टीचा झाला यात आष्टीचा संघ विजयी ठरला.या क्रिडा महोत्सवात भातकुली तालुक्याती ५००विद्यार्थी खेळाडू आणि प्रभारी शिक्षक सहभागी झाले आहे. खो-खो,कबड्डी, व्हॉलीबॉल, बॅडमिटन, टेनिकॉईट, लंगडी हे सांघिक खेळ आणि वैयक्तिक स्पर्धा होत आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे यांनी तर सुत्रसंचालन शैलेन्द्र दहातोंडे यांनी आभार प्रदर्शन संतोष राऊत यांनी केले क्रिडा महोत्सव यशस्वी करण्याकरीता सर्व शिक्षक संघटना पदाधिकारी,विविध गठीत समित्या मधिल पदाधिकारी, केन्द्रप्रमुख सुनिल पांडे,निता सोमवंशी,शैलेन्द्र दहातोंडे,संतोष राऊत,नरेद्र धनस्कर, उमेश चुनकीकर, किशोर रुपनारायण, रविद्र धरमठोक, प्रविण खरबडे, वायगाव शाळेचे दिनेश लांडगे, प्रभुदास नायटकर,पुरुषोत्तम वानखडे, धनश्री जोशी,सिमा लांडगे, रत्नाबाई मावळेकर, आश्विनी कपिले शाळा व्यवस्थापण समिती व गावकरी यांचे सहकार्य लाभले असे क्रिडा महोत्सवाचे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.



# बंद पडलेली शकुंतला रेल्वे पुन्हा होणार सुरू शकुंतला रेल्वेचा मार्ग मोकळा

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक**
**अचलपुर**

शकुंतला इंग्रजाच्या काळापासून सुरू होती .मात्र गेल्या काही वर्षापासून ही रेल्वे गाडी बंद पडली आहे. कुणाल ढेपे यांनी शकुंतला रेल्वे सुरू करण्यासाठी १९ जुलाई महिन्यात २०२३ कालावधीत मध्ये रावसाहेब दानवे.केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री भारत सरकार यांची भेट घेऊन शकुंतला रेल्वे बंद असल्यामुळे नागरिक विद्यार्थ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे . अचलपूर तालुक्यातील शिंदी ,तूळजापुर जहागीर गावातून जाणारी शकुंतला रेल्वे अनेकासाठी सोईची होती.अश्या प्रकारची चर्चा करून मागणी केली होती. अचलपूर ते मूर्तिजापूर पयत शकुंतलेच्या मार्गावर ब्राडगेजची तयारी सुरू करण्यासाठी माती परीक्षण करणे सुरू केले आहे . त्यासाठी जिथे जिथे पुल जिथे जिथे कच्च्या रस्ता आणि जिथे जिथे शंका वाटते त्या ठिकाणची माती परीक्षण हे जोरात सुरू आहे .कारण भरधाव वेगाने चालणारी आणि वजनाने जास्त असणारी ब्राडगेज ट्रेन ही तिचे वजन सांभाळण्याची ताकद त्या जमिनीमध्ये असणे गरजेचे आहे .त्यामुळे हे माती परीक्षण सुरू आहे .अचलपूर ते मूर्तिजापूर ७९ किलोमीटरच्या आत मध्ये काम सुरू आहे .त्यामुळे शकुंतला प्रेमींना हा एक फार मोठा दिलासा आहे.

# आ.रवी राणांच्या उपस्थितीत बडनेरात मनसेच्या कबड्डी सामन्यांचे उद्घाटन

## कारसेवकांचा सत्कार, शहराध्यक्ष गौरव बांते यांचा उपक्रम

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक**
**बडनेरा**

मनसेच्या कबड्डी सामन्याचे उद्घाटन आ. रवी राणा यांच्या हस्ते व मनसे नेते पप्पू पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सावता मैदान येथे मंगळवारी पार पडले. यावेळी स्थानिक ज्येष्ठ नागरिक दिगांबर तायडे यांच्याहस्ते कारसेवकांचा सत्कार करण्यात आला.

आ. रवी राणा यांनी खेळाडूंनाप्रोत्साहन देण्यासाठी



सदैव प्रयत्नरत राहील, असे आश्वासन दिले. तसेच गौरव बांते यांच्या प्रत्येक उपक्रमाला माझा पाठिंबा असतो त्याचप्रमाणे त्यांनी सूचविलेल्या विकासकामांना निधी उपलब्ध करून देण्यासाठीही मी मागे हटणार नाही, अशी ग्वाही आ. रवी राणा यांनी दिली. स्पर्धेचे आयोजकतथा बडनेरा शहराध्यक्ष गौरव बांते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शहरातील विकासकामांचा पाठपुरावा करण्यासह खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठीही आपण प्रयत्नरत राहू, असे आश्वासन गौरव बांते यांनी दिले. मनसे नेते पप्पू पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष रवींद्र बारापात्रे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर अजय जयस्वाल, मनसेचे पदाधिकारी प्रवीण डांगे, धीरज तायडे, हर्षल ठाकरे तसेच प्रभाकर केने, मधुकर श्रीखंडे, दिगंबर तायडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. प्रियंका बांते, वैष्णवी पांडे, निलेश सोनोने, वेदांत अतकरी, विनोद गद्रे, पराग धुमाळे, संकेत बांते, प्रणव पुंड, शुभम शिरभाते, ज्ञानेश्वर लांडे यांच्यासह इतरही कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. उद्घाटनपर कार्यक्रमानंतर कबड्डीच्या सामन्यांना प्रारंभ झाला.

# नियमित कर भरणाऱ्या नागरिकांसाठी वडूरा येथे मोफत दळण व मसाले दळून मिळणार

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**
**तळवेल**

चांदुर बाजार तालुक्यातील वडुरा येथील युवा सरपंच यांनी पाणी बिल व घर टॅक्स वसूल करण्यासाठी वेगळीच शक्कल लढवली आहे ज्या ग्रामस्थानी पाणी बिल व घर टॅक्स भरणा केला अश्या ग्रामस्थ्यांना वर्षभर दळण मोफत दळून मिळणार असल्याचे आवाहन चेतन काकडे ग्रामपंचायत सरपंच वडुरा यांनी केले आहे यांनी कर वसुलीसाठी लावलेली शक्कल ची तालुकाभर चर्चा चालली आहे

ग्रामीण भागामध्ये पाणी बिल व घर टॅक्स वसुली ग्रामपंचायत ची मोठी डोकेदुखी ठरत असते ग्रामपंचायत लक्ष नेहमीच वसुली साठी लागलेले असते परंतु गावकरी वेळेवर आपला टॅक्स भरत नसल्याने ग्रामपंचायत कडे कामे रस्त्यावरील लाईटचे वीजबिल, पाण्याचे वीजबिल व इतर कामे करण्यासाठी निधी उपलब्ध होत नसल्याने गावकाऱ्यांनी गैरसोय होत असते असे होऊ नये म्हणून गावाकऱ्यांना टॅक्स भरण्यासाठी प्रोसाहन करण्यासाठी योजना आखली व काही दिवसातच उन्हाळ्याची चाहूल लागणार आहे उन्हाळ्यामध्ये गावातील महिला शेवळ्या करतात ते सुद्धा नियमित टॅक्स भरणाऱ्या नागरिकांना मोफत देणार तसेच ग्रामीण भागातील नागरिक उन्हाळ्यामध्ये मिरची पावडर हळद धने पावडर वर्षभराचे उन्हाळ्यामध्ये साठवून ठेवतात हे सर्व मसाले मोफत दळून देण्याचा सुद्धा विचार चालू असल्याचे वाडुरा येथील सरपंच चेतन काकडे यांनी सांगितले या निर्णयाची चर्चा सर्वात्र तालुक्यामध्ये चालू आहे.

